## प्रसिध्दी पत्रक

## नवीन विद्युत निर्मिती प्रकल्पांतून निर्माण होणारी वीज वाहून नेण्याकरिता पायाभूत सुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण कंपनी)ला तत्त्वतः मान्यतेबाबत स्पष्टीकरण

१. महाराष्ट्रात, नवीन विद्युत निर्मिती प्रकल्पांतून निर्माण होणारी वीज वाहून नेण्याकरिता पायाभूत सुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण कंपनी)ला तत्वतः मान्यता द्यावी यासाठी, महापारेषण कंपनीने आयोगाकडे एक याचिका दाखल केली होती. या सुविधांवर होणारा खर्च महापारेषण कंपनीच्या वार्षिक महसूली गरज आणि पारेषण आकारांद्वारे तत्वतः वसूल करण्यात येईल, असे या याचिकेत गृहीत धरण्यात आले आहे. या प्रकरणी दिनांक ११ ऑक्टोबर, २००७ रोजी आयोगापुढे सुनावणी झाली.

२. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी होणा-या भांडवली खर्चाच्या वसूलीबाबत महापारेषण कंपनीने उपस्थित केलेले प्रश्न, आयोगाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या विविध आदेश आणि विनियमांमध्ये संबोधित केले होते, असे आयोगाने मत व्यक्त केले. तथापि, या प्रकरणी उपस्थित करण्यात आलेल्या विशिष्ट मुद्द्यांना सुस्पष्ट करण्यासाठी, आपल्या आदेशाद्वारे संबोधित करणे उचित होईल, असा आयोगाने विचार केला आहे. त्यामुळे, आयोगाने (प्रकरण क्र. २००७/३४ मधील ) दिनांक १३ नोव्हेंबर, २००७ रोजी दिलेल्या आदेशात महापारेषण कंपनीने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा सविस्तरपणे परामर्श घेतला आहे. हा आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या वेब-साईटवर उपलब्ध आहे. त्यातील काही विशिष्ट मुद्दे आणि त्यावरील आयोगाचे निर्णय थोडक्यात खाली देण्यात आले आहेतः-

## पारेषण यंत्रणेचे नियोजन

**‘पारेषण यंत्रणा आराखडा’ विकसित करण्याची वैधानिक जबाबदारी राज्य पारेषण कंपनी (स्टेट ट्रान्समिशन युटिलिटी) या नात्याने महापारेषण कंपनीची आहे आणि आपले हे वैधानिक कार्य करताना राज्य पारेषण कंपनीने विकसित केलेल्या पारेषण यंत्रणा आराखड्यास आयोगाची मान्यता घेण्याची गरज नाही. नवीन विद्युत निर्मिती प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज वाहून नेण्याकरिता पारेषण यंत्रणेच्या विकासासह आपला ‘ गुंतवणूक आराखडा’ तयार करण्याचे स्वातंत्र्य पारेषण परवानाधारकास आहे.** अशी पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी झालेला खर्च त्या पारेषण यंत्रणेचा वापर करणा-याकडून वसूल करण्यात येईल. उदाहरणार्थ, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर जर मर्चंट पॉवर प्लॅन्टकडून राज्याबाहेर विजेची विक्री करण्यासाठी करण्यात आला तर , राज्याबाहेर विजेची विक्री करण्यासाठी पारेषण यंत्रणेचा जितका वापर झाला असेल त्या प्रमाणात त्या यंत्रणेवरील खर्चाचा काही भाग हा मर्चंट पॉवर प्लॅन्टकडून वसूल करण्यात येईल. जर महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारक पारेषण यंत्रणेचा वापर करीत असेल तर पारेषण आकार भरण्यासाठी वितरण परवानाधारक जबाबदार राहील आणि त्यामुळे वितरण परवानाधारकाच्या ग्राहकांना हा खर्च करावा लागेल.

## गुंतवणूक आराखड्यास मान्यता

विनियमातील तरतुदींनुसार, प्रस्तावित गुंतवणूक आराखड्यास “तत्त्वतः मान्यता” देतानाही, आवश्यक माहिती, प्रस्तावित गुंतवणूकीची आवश्यकता दर्शविणारी समर्थनार्थ कागदपत्रे, विचारात घेतलेले अन्य पर्याय, खर्च-लाभ विश्लेषण, इ. पारेषण परवानाधारकाने देणे गरजेचे असून गुंतवणूक आराखड्यास तत्त्वतः मान्यतेसाठी केवळ

योजनांची यादी आणि त्यावरील अंदाजित भांडवली खर्च यांची माहिती देणे पुरेसे नसते.

**विद्युत निर्मिती प्रकल्पांसाठी पारेषण यंत्रणेसह वीज वाहून नेण्याची व्यवस्था करणे**

विद्युत निर्मिती प्रकल्पांसाठी पारेषण यंत्रणेसह वीज वाहून नेण्यासाठी व्यवस्था करण्यासंदर्भात, आयोगाने यापूर्वीच आपल्या आदेशांद्वारे स्पष्ट केले आहे की, पारेषणासाठी अशा पायाभूत सुविधा ह्या राज्यांतर्गत पारेषण जाळ्याचा एक भाग आहेत. पारेषणासाठी अशा पायाभूत सुविधा विकसित करण्यावर झालेला खर्च, कोणीही केला असला तरी तो, संपूर्ण पारेषण यंत्रणेवरील खर्चाचाच एक भाग आहे. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापराकरिता सर्व परवानेधारक पारेषण आकारांचा भरणा, आयोगाने मान्यता दिलेल्या प्रमाणात, करीत असतात. त्यामुळे महाराष्ट्रातील ग्राहकांसाठी वापरलेल्या पारेषण जाळ्यावरील मान्यता दिलेला एकूण वार्षिक खर्च हा महाराष्ट्रातील सर्व ग्राहकांना करावा लागतो.

३. आयोगाच्या विनियमांतील आणि आदेशातील विविध तरतुदींचे पालन संबंधित पारेषण परवानाधारकांनी आणि हितसंबधितांनी वेळीच केले तर राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा विकास सुरळीतपणे होण्यास खूप मदत होईल. तसेच त्यामुळे राज्यातील मुक्त प्रवेश ग्राहकांना विजेचा पुरवठा विना-व्यत्यय होण्यासही मदत होईल, असे आयोग पुनः एकदा नमूद करीत आहे.

**सचिव,**
**महाराष्ट विद्युत नियामक आयोग**